पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# ***वार्तापत्र***

***दिनांक- ०९/०९/२०१९***

## पोलीस अधीक्षकांनी अतिदुर्गम कोठी येथील पुरग्रस्त भागातील नागरिकांची घेतली भेट.

गेल्या काही दिवसांपासुन जिल्हाभरात कोसळणाऱ्या अतिमुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नद्या, नाले तुडूंब भरुन वाहत आहेत. अनेक गावांना पुरस्थितीचा सामना करावा लागत आहे. परंतु काल पावसाने थोडीशी विश्रांती घेतल्यानंतर आज पुरग्रस्त अतिदुर्गम कोठी गावाला पाण्याने घातलेला वेढा ओसरला आहे. यामुळे या भागातील नागरिकांची भेट व पुरस्थितीचा आढावा घेण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो., मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग सा़ो. यांनी मौजा कोठी येथील ग्रामस्थांची भेट घेतली.

यावेळी मौजा कोठी येथील नागरिकांनी पुरस्थितीमुळे गावाचे झालेले नुकसान तसेच पुरामुळे निर्माण झालेल्या समस्या मा. पोलीस अधीक्षकांसमोर मांडल्या. मौजा कोठी येथील दोन ग्रामस्थांच्या घरांची पडझड झाल्याने त्यांना मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांनी आर्थिक मदत दिली. यावेळी नागरिकांना धीर देत गडचिरोली पोलीस दल तसेच जिल्हा प्रशासन आपल्या सर्वांच्या पाठिशी असुन आपल्याला या पुरस्थितीचा सामना करण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी नागरिकांना दिले.



